Volume : 1 | Issue : 3 | March 2012 ISSN - 2250-1991

Research Paper Economics

# भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार व विकसित देश : एक मूल्यमापन

* Dr. Ashok Shankarrao Pawar ** Dr Sunita J Rathod

*,** Asst. Prof. & Research Guide, Dept. Of Economics, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

**ABSTRACT**

प्रस्तुत लेखात विदेशी व्यापाराची भूमिका, विकसित देशासी असलेला व्यापार, योजना निहाय स्थिती, जागतिक व्यापारातील वाटा व जागतिक मंदीचा प्रभाव 1991 नंतर विदेशी व्यापाराची संरचना, 1991 नंतर विदेशी व्यापाराचा विस्तार ,भारतीय निर्यात व अमेरिका, पंचवार्षिक योजना काळातील भारताचा व्यापार ,भारताच्या परकीय व्यापाराचा आढावा, विशेष आर्थिक क्षेत्रातील भारताची निर्यात इत्यादी घटकानुसार अभ्यास करण्यात आलेला आहे.

**Keywords :**

गोशवारा

सुधारणा कालावधीपासून (1990–91) मंदीपर्यंतचा व्यापार तोल – 16,934 कोटी रू. तर अमेरिकन डॉलर – 9,438 त्या सूटीत वाढ होवून ती अनुक्रमे 962 कोटी तर – 61,782 अमेरिकन डॉलर झाली. अर्थात सुधारणा कालावधीपासून मंदीच्या कालापर्यंत विदेशी व्यापाराची स्थिती समाधानकारक नाही त्यात मंदीनी भर टाकली आहे.

विष्व अर्थव्यवस्थेचा विकास दर 2008 व 2009 साठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनी अनुक्रमे 3.7 टक्के व 3.8 टक्के निष्चित केली होती. परंतु 2007 मध्ये ती 4.9 टक्केनी वाढली होती. भारताचा सकल घरेलू उत्पादनाचा वृद्धीदर 2006–07 व 2007–08 मध्ये अनुक्रमे 9.7 टक्के व 9.1 टक्के होता त्यात मंदीमुळे घट होवून 6.1 टक्के झालेला आहे.

योजना कालावधीत पहिल्या पंचवार्शिक योजनेदरम्यान (1951 ते 1956) निर्यात 1,269 आयात 1273 व्यापार षेश (–) 4 लक्ष अमेरिकेत डॉलर होता . निर्यात व आयात वृद्धिदर अनुक्रमे 24.9 टक्के व (–) 1.5 टक्के होता. तो 1990–91 या सुधारणा कालावधीपूर्वी निर्यात 18,143, आयात 24,075, व्यापार षेश (–) 5932 लक्ष अमेरिकन डॉलर होता. निर्यात व आयात वृद्धीदर अनुक्रमे 9.2 व 13.5 टक्के होता 2008–2009 मध्ये निर्यात 1,68,704, आयात 287759 तर व्यापारषेश (–) 1,19055 लक्ष अमेरिकन डॉलर होता. अर्थात निर्यात–आयात वृद्धीदर अनुक्रमे 3.6 टक्के व 14.4 टक्के होती. 1950–51 ते 2008–09 व आजतागायत व्यापारषेश ऋणात्मक राहले आहे.

जागतिक मंदीच्या लाटेत भारताच्या विदेशी व्यापाराची स्थिती अत्यंत वाईट असल्याचे आढळून येते. जानेवारी 2008 मध्ये भारताने 23 हजार मिलियन डॉलरची आयात केली होती त्या तूलनेत निर्यात 5 हजार मिलियन डॉलरची होती. 5 जानेवारी 2012 मध्ये 35 हजार मिलियन डॉलरची आयात तर निर्यात 25 हजार मिलीयन डॉलरपेक्षा कमी होती. अर्थात आयातीच्या तुलनेत निर्यातीचे प्रमाण कमी असल्याचे आढळून येते. 2008–09 मध्ये एकंदरीत परिणामानंतर भारत जागतिक स्तरावर सर्वात वेगवानपणे विकास करणाऱ्या अर्थव्यवस्थेत चीन नंतर दुसऱ्या स्थानावर भारतीय अर्थव्यवस्था गणली जाते. 2007–08 या वर्शातील अमेरिकन निर्यात 28.9 टक्केवरून घटून 2008–09 मध्ये 3.6 टक्के घटीबरोबर आयात वृद्धीदरातही घट झाली आहे.

प्रस्तावना :( प्दजतवकनबजपवद)पहिल्या योजना कालावधीत निर्यात 622 कोटीची तर आयात 730 कोटीची होती. व्यापारातील तुट (–) 108 कोटीची होती, सुधारणा कालावधीपूर्वी अर्थात सातव्या योजनेपर्यंत (1985–1990) त्यात सतत वाढ होवून (–) 7730 कोटीची तुट झाली. 1990–91 मध्ये तुटीचा आकडा (–) 10635 कोटीवर पोहचला. 2007–08 मध्ये अर्थात 10 व्या योजनेत ती तुट (–) 3,24,678 कोटीपर्यंत प्रचंड वाढली. एकाच देषातील नागरिक जेव्हा परस्पराषी व्यापार करतात तेव्हा त्या व्यापाराला देषी व्यापार म्हणतात. देषाच्या भौगोलिक सीमांच्या आत हा व्यापार होत असतो. त्यामुळेया व्यापाराला अंतर्गत व्यापार (प्दजमतदंस जतंकम) असे म्हणतात. परंतु एका देषातील नागरिक जेव्हा दुसऱ्या देषातील नागरिकांकडून वस्तुंची खरेदी किंवा विक्री करतात, तेव्हा त्याला विदेष व्यापार (थ्वतमपहद जतंकम) असे म्हणतात. हा व्यापार राश्ट्रा–राश्ट्रांमध्ये होत असल्याने त्याला आंतरराश्ट्रीय व्यापार असे म्हणतात. हा व्यापार राश्ट्रा–राश्ट्रांमध्ये होत असल्याने त्याला आंतरराश्ट्रीय व्यापार असेही म्हणतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक विकासाचे धोरण निष्चित करतांना विदेशी व्यापाराचे महत्त्वाचे स्थान असते. विकसनषील देषात अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षात घेउन विदेशी व्यापार धोरण ठरविण्यात उत्पादनक्षमता वाढविण्याकरिता यंत्रसामग्री व इतर आवष्यक वस्तुंची मोठ्या प्रमाणात विकसनषील देषात आयात करावी लागते. उत्पादन क्षमता निर्माण करण्याकरिता व ती वाढविण्याकरिता जी आयात करावी लागते त्या आयातील विकासात्मक किंवा विकासाभिमुख आयात असे म्हणतात. पोलाद, रेल्वे व जल, विद्युत इत्यादी प्रकल्पांसाठी जी आयात करावी लागते ती विकासात्मक आयात होय.

विकासप्रक्रिया सुरू झाल्यानंतर स्थापित उत्पादनक्षमतेचा पूर्ण वापर करता यावा, म्हणून होणाऱ्या आवष्यक आयातीला देखभाल आयात असे म्हणतात. विकासात्मक व देखभाल आयातीबरोबरच सेवनिय किंवा उपभोग्य वस्तुंचीही आयात विकसनषील देषाला आवष्यक असते. उपभोग्य वस्तुंच्या आयातीमुळे स्फितिकारक प्रवृत्तीला आळा बसतो. भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात अन्नधान्याची केलेली आयात ही अषा प्रकारची आयात होय.

2010–11 या आर्थिक वर्शात केंद्र सरकारचे 200 अब्ज डॉलरचे उद्दिश्ट होते. मात्र भारताने एप्रिल 2010 ते फेब्रुवारी 2011 या 11 महिन्याच्या कालावधीत पार केले. या काळात एकूण 205.2 अब्ज डॉलरची निर्यात झाली. एकट्या फेब्रुवारी 2011 महिन्यातील निर्यात 23.6 अब्ज डॉलर असून यात 49.8 टक्के वाढ झाली. उत्तर अमेरिका, आषिया व आफ्रिका देषांमधून असलेल्या भारतीय उत्पादन मागणीमुळे पहिल्या 11 महिन्यात 31.4 टक्के अधिक निर्यात झाली. यामुळे केंद्राने चालू एकूण आर्थिक वर्शातील निर्यातीचे उद्दिश्ट 230 ते 235 डॉलर इतके निष्चित केले.

फेब्रुवारी मधील आयातही 21.2 टक्क्यांनी वधारली असून हे प्रमाण 31.07 अब्ज डॉलर झाले. परिणामी एकूण व्यापारी तुट 8.1 अब्ज डॉलरची झाली एप्रिल ते फेब्रुवारीमधील एकूण आयात 18 टक्क्यांनी वधारून 305.3 अब्ज डॉलर झाली चालू आर्थिक वर्शातील एकूण आयातही 350 अब्ज डॉलर होईल.

विदेषी व्यापाराची व्याख्या :

जेव्हा एका देषाची विविध देषांबरोबरच वस्तु व सेवाची देवाण–घेवाण होते त्याला विदेशी व्यापार असे म्हणतात.

विदेषी व्यापाराची भूमिका :

15 ऑगस्ट 1947 पूर्वी भारत पारतंत्र्यात होता. यामुळे भारताचा एक देष म्हणून विदेष व्यापार होत नसून केवळ एक वसाहत या दृश्टिकोणातून व्यापार केला जात असे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देषाच्या अर्थव्यवस्थेतील उत्पादनक्षमता वाढविण्याचे प्रयत्न केले गेले. विकासाच्या व प्रारंभिक अवस्थेत मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान आयात करणे गरजेचे होते. या आयातीला विकासात्मक आयात म्हणतात. तंत्रज्ञान व यंत्रसामग्रीमुळे देषात नविन उद्योगांची निर्मिती करून उत्पादनात वाढ करणे, ही प्रमुख भूमिका होती. उदा भारतात लोह–पोलादाचे कारखाने, वीज निर्मितीला लागणारे तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, कच्चा माल इत्यादींची आवष्यकता असते. या साधनांच्या आयातीषिवाय हे प्रकल्प निर्मिती षक्य नाही.

याषिवाय काही उपभोग्य वस्तुंची आयातसुद्धा देषाला करावी लागते. विदेषी व्यापारात या आयातींना विकासात्मक आयात, स्फिती विरोधक आयात म्हटले जाते.

सुरूवातीस आपल्या देषाची आयात अधिक असून निर्यात मात्र नाममात्र होती. भारताच्या काळात कच्च्या मालाची निर्यात करून व्यापार आढावा संतुलित करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, भारतीय विदेषी व्यापार आढाव्यात नेहमीच प्रतिकुलता दिसून येते.

1991 नंतर विदेषी व्यापाराची संरचना :

1991 नंतर खुलेपणा – विदेषी व्यापार धोरणाचा अविभाज्य भाग होता. जुलै 1991 मध्ये रूपयाचे अवमूल्यन, रूपयाची सुरूवातीला व्यापारावर त्यानंतर संपूर्ण चालू खात्यावर परिवर्तनीयता आयात करातील खूलेपणा, सीमा षुल्कातील दरात कपात, काही खूलेपणाने आयात करण्याची मुभा त्यामुळे अंतर्मुख धोरणाऐवजी बहिर्मुखी धोरणाचा स्वीकार करण्यात आला.


1991 नंतर विदेषी व्यापाराचा विस्तार :

उदारीकरणानंतर भारतीय विदेषी व्यापारात झपाट्याने वाढ झाली. 1990–91 मध्ये एकूण व्यापाराचे प्रमाण 42.2 कोटी डॉलर होते त्यास 18.1 कोटी डॉलर निर्यात आणि 24.1


Volume : 1 | Issue : 3 | March 2012 ISSN - 2250-1991

कोटी डॉलर आयातीचा समावेष आहे. यामध्ये 2007–08 मध्ये वाढ होवून ते 391.42 कोटी डॉलर झाल्याचे आढळून येते. त्यात 155.51 कोटी डॉलर निर्यात आणि 235.91 कोटी डॉलर आयातीचा समावेष आहे. परंतु 1992–93 नंतर 1993–94, 2000–01 तथा 2002–03 अपवाद वगळता डॉलरच्या तुलनेत आयात वृद्धीदर निर्यातीच्या तुलनेत अधिक राहिले आहे. 1991–92 मध्ये व्यापार षेशाचा घाटा 1.5 कोटी डॉलर होता. त्यात वाढ होवून 1992–93 (3.3) 1991–2000 (12.8) 2006–07 (59.39) तसेच 2007–08 मध्ये 80.94 कोटी डॉलर पर्यंत पोहचल्याचे स्पश्ट होते.

भारतीय आयातीतील प्रमुख देष




भारतीय निर्यातीतील प्रमुख देष




एप्रिल–डिसेंबर 2011 दरम्यान अमेरिकन निर्यात 25.8 टक्के वृद्धी होवून तो 217.6 अब्ज अमेरिकन डॉलर पर्यंत वाढला आहे. तर वाणिज्य सचिव राहूल खूल्लर यांच्या मते आयात 350.9 अब्ज डॉलर (30.4 टक्के) वृद्धी व व्यापारषेश (–) 133.3 अब्ज होता. डिसेंबर 2011 मध्ये भारताची निर्यात 25 अब्ज व आयात 37.8 अब्ज तर व्यापार षेश (–) 12.8 अब्ज अमेरिकन डॉलर होती.

एप्रिल–डिसेंबर 2011 दरम्यान खालील क्षेत्रांनी विषेश कामगिरी केली आहे. त्यात अभियांत्रिकी 45.3 अब्ज अमेरिकन डॉलर (21.6 टक्के) पेट्रोलियम व तेल उत्पादन 43.9 (55 टक्के) जडजवाहिरे 33.5 (38.5 टक्के), औशधी 9.1 (21.5 टक्के), चमडा 3.4 (25.8 टक्के), सूती दोरा आणि कपडा 5.1 (13 टक्के), इलेक्ट्रॉनिक उपकरणे 6.7 (21.1 टक्के), रेडीमेड कपडा 9.6 (23.7 टक्के), अब्ज अमेरिकन डॉलर निर्यात वृद्धी झालेली आहे. पीओएल 105.6 (40.4 टक्के), सूवर्ण व रजत 45.5 (53.8 टक्के), मषनीरी 25.8 (27.7 टक्के), खते 8.2 (35 टक्के), कोळसा 12.5 (62 टक्के) अब्ज अमेरिकन डॉलर वृद्धी झाली असल्याचे स्पश्ट होते. परंतु इतर बाबतीत समाधानकारक स्थिती आढळून येत नाही.

पंचवार्शिक योजना काळातील भारताचा आंतरराश्ट्रीय व्यापार (कोटीत) :

| योजना | आयात | निर्यात | व्यापार तोल | अदृष्य गोश्टीतून मिळणारे उत्पन्न | व्यवहार षेश |
|---|---|---|---|---|---|
| पहिली | 3651 | 3109 | –542 | 500 | – 42 |
| दुसरी | 5402 | 3063 | –2339 | 618 | 1725 |
| तिसरी | 6119 | 3735 | –2382 | 431 | 1951 |
| चौथी | 9862 | 9049 | –1564 | 1664 | +100 |
| पाचवी | 27697 | 23648 | –4049 | 6221 | +2228 |
| सहावी | 74931 | 45256 | –29675 | 19072 | 11384 |
| सातवी | 144369 | 90165 | –54204 | 13157 | 41047 |
| आठवी | 488845 | 431285 | –54204 | –– | –– |
| नववी | 1023820 | 842005 | –181815 | –– | –– |
| दहावी | 2638365 | 1944062 | –69429 | –– | –– |

विदेषी व्यापारातील वाटा :

भारत जगातील 190 देषांना विविध वस्तुंची निर्यात करतो व 140 देषांकडून विविध वस्तु आयात करतो. 1950–51 साली भारताचा जागतिक व्यापारातील वाटा 2.1 टक्के होता, तो नंतरच्या काळात कमी झाला. 1999 नंतर त्यात सुधारणा होउन सध्या 0.8 टक्के इतका आहे. 2004–09 च्या व्यापार धोरणानुसार 2000 पर्यंत तो 1.5 टक्के करणे अपेक्षित आहे. तो 2012 मध्ये एकूण जगातील व्यापारात भारताचा वाटा.1.44 टक्के आहे.

विषेश आर्थिक क्षेत्रातील भारताची निर्यात

2003–04 कालावधीत विषेश आर्थिक क्षेत्रातील निर्यात 13854 रू. कोटी (39 टक्के) होती. भारताची निर्यात 293367 रू. कोटी होती. त्यात एकूण निर्यातीतील विषेश आर्थिक क्षेत्रातील निर्यातीचा वाटा 4.7 टक्के होता. त्यात वाढ होवून पुढील आठ वर्शात अर्थात 2010–11 मध्ये विषेश आर्थिक क्षेत्रातील निर्यात 223132 रू. कोटीची होती. देषाची एकूण निर्यात 751633 (23.4 टक्के) होती. त्यात एकूण निर्यातीच्या तुलनेत विषेश आर्थिक क्षेत्रातील वाटा 29.7 टक्के दरानी वाढला आहे. परंतु त्याचे इतर आर्थिक, सामाजिक व रोजगार विशयक परिणामाकडे डोळेझाक करून चालणार नाही.

विदेषी व्यापार धोरणाचे मूल्यमापन :

प्रभावी सरक्षण दर 1989–90 मध्ये 87 टक्के होता तो 1993–94 मध्ये 62 टक्के, तर 1995–96 मध्ये 30 टक्के मोद्रीक संरक्षण दर धोरणात बदल करण्यात आला.

- सरकारी धोरण अंतर्मूखऐवजी बहिर्मूख झाले.
- भारतीय उद्योगावरील संरक्षणात्मक धोरण दर्शविले.
- सीमा शुल्कास मोठी कपात.
- 1991 धोरणानुसार व्यापाराचे परिवर्तन करण्यात आले.
- भारताचा सकल घरेलू उत्पादनाच्या विदेशी व्यापारात वाढ.

निश्कर्श :

- 2005 साली एकूण निर्यातीत जागतिक पातळीवर भारताचा क्रमांक 29 वा होता तर 2006 साली तो 27 वा होता.
- स्वातंत्र्यानंतर भारताच्या आयात तसेच निर्यातीचे आकारमान प्रचंड प्रमाणात वाढत गेले.
- व्यापार तुट मोठ्या प्रमाणावर वाढत गेली.
- ज्या दराने निर्यात वाढली, त्यापेक्षा आयातवाढीचा दर अधिक होता.
- फक्त दोन वर्षे निर्यात आयातीपेक्षा जास्त होती 1972–73 साली ती 104 कोटी रूपयांनी तर 1976–77 मध्ये 68 कोटी रूपयांनी जास्त होती.
- भारताच्या एकूण निर्यातीत हस्तकला वस्तुंचा वाटा सर्वात जास्त असून त्यामध्ये रत्ने आणि उद्योगाद्वारे भारताला सर्वात जास्त आहे.
- कापड उद्योगाद्वारा भारताला सर्वात जास्त प्रमाणात परकीय चलन मिळते, कारण यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या आयातीवर फार कमी खर्च होतो.
- निर्यात/आयातीचे गुणोत्तर (2004–05) – 71 टक्के (2007 टक्के 5–06) – 6
- निर्यातीचे जीडीपीशी प्रमाण (2003–04) 10.7 टक्के व आयातीचे जीडीपीशी प्रमाण (2003–04) – 13.3 टक्के

एकंदरीत विष्व व्यापारातील भारताचे योगदान अत्यंत कमी आहे. सकल घरेलू उत्पादनाच्या तुलनेत जगातील सर्वात मोठी व दूसरी अर्थव्यवस्थावाल्या भारताचे स्थान वस्तू निर्यात क्षेत्रात विसावे व आयातीत तेरावे आहे. जागतिक निर्यातीतील वाटा केवळ 1.44 टक्के व आयातीचा वाटा केवळ 2.12 टक्के आहे.

मागील सुधारणा कालखंडातील दोन दषकात विष्व व्यापार गतीने वाढत असताना व्यापार विशयक अडचणी देखील कमी झालेल्या नाहीत. प्रस्तुत कालावधीत विषेशता प्रवृत्ती वाढल्यामुळे दक्षता, विष्वसनियता वाढल्यामुळे परिवहन खर्चात घट झाल्यामुळे वाणिज्य व व्यापारविशयक बाबीला प्रोत्साहन मिळाले आहे. मूक्स व्यापारी करार विशयक बाबतीत वाढ होत असताना भारताला डोळे झाक करून भागणार नाही. 2020 पर्यंत व्यापारातील वाटा दूप्पट करण्याचे उद्दिश्ट प्राप्त करण्यासाठी सर्व षक्यता तपासणे गरजेचे काळाची गरज आहे.

## REFERENCES

1. yojana (Feb-2012),Yojana Bhavan,Sansad Marg,New Delhi-01 | 2. Southern Economist,Bangalore,-03 | 3. Economics Servey-2012 | 4. Reserve Bank of India - Economic Survey 2011 (Table A 7 To 76). | 5. http ://mopi.nic.in cas on 12 January 2012. | 6. Mathani D.N. International Trad and Finance | 7. www.commerce.nic.in / trade stats India Trade press. 95p, Dated 01.01.2012. | 8. WTO secretariate and Imf. ministry of commerce and industry govt. of India (2011) Data book for DCH : 15 th Jan 2012. Page 62 to 189.